MHLA050004892024

विशेष दिवाणी दावा क्र.२६/२०२४
इफ्तेकार वि. सरोजनी

## नि.क्र.१८ खालील आदेश

**०१.** प्रतिवादी क्र.१ ने सदरचा अर्ज दाखल करुन नमूद केले की, आवश्यक कागद न मिळाल्याने कैफीयत देण्यासाठी तिला १६ दिवसांचा विलंब झाला आहे. तिची तब्येत ठिक नसल्याने तिला सदरचा विलंब झाला आहे. तरी, विलंब माफ करुन कैफीयत पटलावर घेण्याची विनंती करण्यात आली.

**०२.** म्हणणे देवून वादीने नमूद केले की, त्यामध्ये प्रामाणिकपणाचा अभाव आहे आणि सत्य परिस्थिती लपवली आहे. दि.१५/०२/२०२५ रोजी याकामी हजर झाल्यानंतर दि.प्र.संहिता क्रम ८ नियम १ अन्वयेचा विहीत कालावधी ओलांडून गेला आहे. अर्जात संयुक्तीक कारण नाही, त्यामुळे अर्ज रद्द व्हावा.

**०३.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी हे दि.१५/०२/२०२५ रोजी नि.क्र.१३ अन्वये दाव्यात हजर झाली. तेथून पुढे ३० दिवसांत म्हणजे दि.१४/०३/२०२५ रोजी तिने कैफीयत देणे आवश्यक होते. आवश्यक कारणांसह सदर मुदत पुढे वाढवताही आली असती. सदर अर्ज तिने दि.३०/०४/२०२५ रोजी दिला. त्यामुळे, दि.प्र.संहिता क्रम ८ नियम १ मधील परतुंकानूसार अर्ज मुदतीत आहे. सबब, तो मंजूर करण्यात येतो. कैफीयत पटलावर घेण्यात येते.

स्वाक्षरीत/-

**दिनांक:०३/०९/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**